<u>आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत नॉन-स्ट्रक्चरल कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत</u> : -
NIT, Bhopal यांचा Building Heat Resilience through Blue-Green and Gray Infrastructure - A Hyper local approach for City of Pune याबाबतचा संशोधन प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग,
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र-२०२६/प्र.क्र.२८६/आपत्ती-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० जुलै, २०२६.

<u>वाचा :-</u>

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम (सुधारित) - २०२५.
२) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नवी दिल्ली यांच्या दि.०६.०३.२०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.
३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.आव्यप्र-२०२४/प्र.क्र.०१/आव्यप्र-२, दि.१० जानेवारी, २०२४ व दि.१३.१२.२०२४ रोजीचे पूरक पत्र.
४) दि.१३.०८.२०२५, दि.२६.११.२०२५ व दि.११.०३.२०२६ रोजीच्या प्रकल्प मूल्यमापन समितीच्या बैठकीचे इतीवृत्त.
५) दि.०१.०४.२०२६ रोजीच्या राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६) दि.२३.०६.२०२६ रोजीच्या राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत झालेला निर्णय.
७) दि.२६.११.२०२५, दि.०३.१२.२०२५ व दि.०२.०४.२०२६ रोजीच्या तांत्रिक मूल्यमापन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना</u> :-

केंद्र व राज्य शासनाने घोषित केलेल्या आपत्तींचे सौम्यीकरण करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाने महाराष्ट्र राज्यासाठी राज्य आपत्ती सौम्यीकरण निधी अंतर्गत (State Disaster Mitigation Fund, SDMF) सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ अशा ५ वर्षांकरीता निधी मंजूर केलेला आहे. सदर निधीच्या वापराबाबत आपत्ती व्यवस्थापन विभाग, केंद्रीय गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दि. १४ जानेवारी २०२२ रोजी व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दि. ६ मार्च २०२३ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

२. NDMA ने आपत्ती सौम्यीकरणासाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीपैकी ५ % निधी आपत्ती सोम्यीकरणासाठी उपयोगात येणाच्या दृष्टीने होणारे संशोधन व विकास (Research and Development) करण्यास राखीव ठेवला आहे.

३. हवामान बदल, वेगाने होणारे शहरीकरण, वाढते काँक्रीटीकरण, हरित क्षेत्रातील घट आणि वाढते वाहन प्रदूषण यामुळे पुणे शहरात उष्णतेच्या लाटांची तीव्रता आणि कालावधी सातत्याने वाढत असून Urban Heat Island (UHI) चा प्रभाव अधिक गंभीर होत आहे. परिणामी शहरातील अनेक भागांमध्ये तापमान लक्षणीयरीत्या वाढून नागरिकांच्या आरोग्यावर, ऊर्जा वापरावर, पर्यावरणावर आणि एकूणच शहरी जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत आहेत. या समस्येवर दीर्घकालीन व शाश्वत उपाय म्हणून पुणे शहरासाठी ब्ल्यू (जलस्रोत), ग्रीन (हरित क्षेत्र) आणि ग्रे (हवामान-संवेदनशील पायाभूत सुविधा) यांचा समन्वित वापर करून उष्णता प्रतिरोधक (Heat Resilience) शहरी आराखडा विकसित करण्याचा हा प्रस्ताव आहे. प्रकल्पांतर्गत GIS, रिमोट सेन्सिंग, क्षेत्रीय सर्वेक्षण, हवामान विश्लेषण आणि संगणकीय मॉडेलिंगच्या साहाय्याने उष्णतेची जोखीम असलेली प्राधान्य क्षेत्रे ओळखून त्याठिकाणी तलावांचे पुनरुज्जीवन, वृक्षारोपण, हरित पट्टे, हरित छते, शीतल छते (Cool Roofs), पारगम्य रस्ते, पर्जन्यजल संधारण आणि नैसर्गिक जलनिस्सारण प्रणाली यांसारख्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी सुचविण्यात येईल. या अभ्यासाद्वारे स्थानिक सूक्ष्म हवामानात सुधारणा, तापमानात घट, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण, ऊर्जा वापरात बचत, भूजल पुनर्भरण, जैवविविधतेचे संवर्धन आणि हवामान बदलास अनुकूल शाश्वत शहरी विकासाला चालना मिळेल. तसेच या प्रकल्पातून विकसित होणारे एकात्मिक ब्ल्यू-ग्रीन-ग्रे पायाभूत सुविधा मॉडेल पुणे शहरासाठी प्रभावी Heat Action Plan तयार करण्यास उपयुक्त ठरेल आणि भविष्यात महाराष्ट्रातील तसेच देशातील इतर वेगाने विकसित होणाऱ्या शहरांसाठीही मार्गदर्शक ठरेल अशा शिफारसी विकसित करणेबाबतचा सदर प्रस्ताव आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने NIT, Bhopal यांचा Building Heat Resilience through Blue-Green and Gray Infrastructure - A Hyper local approach for City of Pune या रु.२,१०,००,०००/- इतक्या किंमतीच्या संशोधन प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

NIT, Bhopal यांच्या Building Heat Resilience through Blue-Green and Gray Infrastructure - A Hyper local approach for City of Pune या या रु.२,१०,००,०००/- (रुपये दोन कोटी दहा लक्ष फक्त) इतक्या खर्चास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा शासन निर्णय प्रकल्प मूल्यमापन समिती (PAC), तांत्रिक मुल्यमापन समिती (TAC) व राज्य कार्यकारी समिती (SEC) यांच्या बैठकीत झालेला निर्णय तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग - पहिला, उप विभाग - तीन, अ.क्र.४ , परिच्छेद क्र.२७ (२) मधील तरतूदी व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) च्या दि.२३.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित होणा-या इतीवृत्ताच्या अधीन राहुन व आंतरवित्तीय सल्लागार तथा सहसचिव, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. या कामी होणारा खर्च मागणी सी-६, २२४५, नैसर्गीक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य, ०७ आपत्ती व्यवस्थापन, १०१, आपत्ती सौम्यीकरण (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च (९१) (०१) राज्य आपत्ती सौम्यीकरण निधी (वित्त आयोग) (अनिवार्य) (२२४५ ४२५९) ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजुर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२०१८४३४१२१४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJEEV ANANT RANE

Digitally signed by SANJEEV ANANT RANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept,
2.5.4.20=65127096B801093AD7FB61EB80E8615C3832B44354B8038DD89289E85848D9A9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=8AC7DCEA96B950440D554DF2C7F54D6021A8C9AC921A09CC853B5817534BD427, cn=SANJEEV ANANT RANE
Date: 2026.07.20 18:44:40 +05'30'

(संजीव राणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहीतीस्तव :

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री,आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
९) वित्तीय सल्लागार तथा सह सचिव, आ. व्य., मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) NIT, Bhopal, भोपाळ.

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

१) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
२) महालेखापाल (महाराष्ट्र-१) मुंबई/नागपूर.
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४) अवर सचिव, अर्थसंकल्प कार्यासन, आ.व्य.म.व पु., मंत्रालय, मुंबई.
५) निवड नस्ती/ आव्यप्र-२.